आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
०६ मे २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

पहलगाम हल्ल्यानंतर युद्धसदृश स्थितीची शक्यता लक्षात घेऊन देशात २४४ ठिकाणी युद्धस्थितीतला नागरी संरक्षण सराव करण्यात येणार

राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनं प्रधानमंत्र्यांची राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांशी चर्चा

जातनिहाय जनगणनेच्या अंमलबजावणीविषयी काँग्रेसच्या विविध सूचना

सातव्या खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत जलतरणात आदिती हेगडे हिनं सुवर्णपदक पटकावत महाराष्ट्रासाठी पदकांचं खातं उघडलं

**आणि**

देशाच्या विविध भागात जोरदार पावसाची शक्यता

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणावाच्या पार्श्वभूमीवर युद्धसदृश स्थिती उद्भवण्याची शक्यता गृहीत धरून सुसज्ज राहण्याच्या उद्देशानं केंद्रीय गृह मंत्रालयानं सर्व राज्यांना उद्या म्हणजे सात मे रोजी, मॉक ड्रिल म्हणजेच युद्ध सज्जता सराव करण्याचे आदेश दिले आहेत. केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन आज त्यासंदर्भात सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांची बैठक घेत आहेत. नागरी संरक्षण विभागाचे महासंचालक, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे महासंचालक आणि इतर संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित आहेत.

देशभरातल्या २४४ नागरी संरक्षण प्रभागांमधे हा सराव होणार असून महाराष्ट्रात मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक या जिल्ह्यांमधे निवडक ठिकाणी हा सराव होईल. हवाई हल्ल्याच्या वेळी वाजवला जाणारा सायरन वाजविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

हल्ला झाल्यास करण्याच्या हालचालींविषयी नागरिकांना, विशेषतः विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणं, तसंच धोक्याचा इशारा देणारी यंत्रणा, नियंत्रण कक्ष, इत्यादींची सज्जता तपासून पाहणे हा या सरावाचा भाग आहे.

दरम्यान पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित दोवाल यांची आज भेट झाली. प्रधानमंत्र्यांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीत सुमारे ४० मिनिटं  महत्त्वपूर्ण बाबींवर चर्चा झाली.

**<><><><><>**

सुरक्षा यंत्रणांनी अतिरेक्यांची शोध मोहीम वेगाने हाती घेतली आहे. आज जम्मू काश्मीरच्या बडगाम जिल्ह्यात दोन संशयितांना ताब्यात घेतलं. या दोघांवर हल्लेखोरांना मदत केल्याचा आरोप आहे. त्या दोघांचीही कसून चौकशी सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. दरम्यान, पंजाबमध्ये सुरक्षा दलानं पंजाबच्या सीमावर्ती भागात मोठ्या प्रमाणात स्फोटके जप्त करण्यात आली आहेत.

**<><><><><>**

पाकिस्तानी सैन्याने काल रात्री जम्मू-काश्मीरमधील कुपवाडा, बारामुल्ला, पूंछ, राजौरी, मेंढर, नौशेरा, सुंदरबनी आणि अखनूर येथे नियंत्रण रेषेवर अकारण गोळीबार केला. भारतीय लष्कराने या गोळीबाराला योग्य उत्तर दिले असून कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नसल्याचं सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारतीय नौदल आणि संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या आणि विकसित मल्टी इन्फ्लुएंस ग्राउंड माइन अर्थात एमआयजीएमची लढाऊ चाचणी काल यशस्वीरित्या पार पाडली. या यशाबद्दल संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी डीआरडीओ, भारतीय नौदल आणि उद्योग जगताचं कौतुक केले आहे. या प्रणालीमुळे भारतीय नौदलाची समुद्राखालील युद्धक्षमता आणखी वाढेल असं ते

म्हणाले. पाण्याखाली प्रतिकार करणारी ही प्रगत नौदल लढाऊ प्रणाली असून भारतीय नौदलाची क्षमता वाढविण्यासाठी ही यंत्रणा तयार करण्यात आली आहे. सागरी जहाजांद्वारे निर्माण होणाऱ्या ध्वनिक, चुंबकीय, दाब अशा प्रभावांच्या नोंदीसाठी ही प्रणाली अनेक सेन्सर्सने सुसज्ज आहे.

**<><><><><>**

जागतिक पातळीवर प्रतिभावान व्यक्तींची मागणी मोठी असून ती पूर्ण करण्यासाठी भारत सिद्ध आहे, असा विश्वास परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी व्यक्त केला. ते आज नवी दिल्लीत गती या कार्यक्रमाचं उद्घाटन करताना बोलत होते. समकालीन युगात भारताचं मनुष्यबळ अधिक कार्यक्षम होण्यासाठी सरकारनं कौशल्य प्रशिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षणाचे विविध प्रयत्न सुरू केले आहेत, असं सांगताना जयशंकर म्हणाले...

**होल्ड... बाईट - जयशंकर**

*माझा थोडक्यात मुद्दा असा आहे की, जागतिक स्तरावर प्रतिभेला मागणी आहे आणि भारतात असे प्रतिभावान मुबलक आहेत. भारतीय प्रतिभेला जागतिक स्तरावर प्रवेश मिळवून देण्यासाठी आम्ही मूलभूत पातळीवर काम करत आहोत. आता, स्पर्धेत ते किती उत्तम कामगिरी करतात आणि त्याचे प्रमाण काय असेल, ते व्यक्तिसापेक्ष असेल.*

**<><><><><>**

दहशतवादविरोधी लढ्यात अमेरिका भारताला सर्वतोपरी मदत करेल, असं अमेरिकेच्या संसदेचे अध्यक्ष माईक जॉन्सन यांनी म्हटलं आहे. भारत अमेरिकेचा महत्वपूर्ण भागीदार असल्याचंही ते म्हणाले. भारत आणि अमेरिकेदरम्यानच्या व्यापार कराराबाबतही त्यांनी विचार मांडले. दोन्ही देशाच्या व्यापार वाटाघाटी यशस्वी होतील, अशी अशा त्यांनी व्यक्त केली. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर ट्रम्प प्रशासनानं भारताच्या दहशतवादविरोधी लढ्याला पाठिंबा दिला असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रदूषण, हवामान बदल आणि बदलती जीवनशैली यामुळे रुग्ण संख्या वाढत असलेल्या तसंच दीर्घ कालीन आजारांपैकी एक मानल्या जाणाऱ्या अस्थमा म्हणजेच दमा या आजाराबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशानं आज सर्वत्र जागतिक दमा दिवस साजरा केला जात आहे.  दमा हा आजार कोणत्याही वयात होणारा असल्यामुळे या रुग्णांनी आरोग्य राखून आजारावर नियंत्रण कसे ठेवावे, याबाबतही या दिवसाच्या निमित्तानं मार्गदर्शन केलं जात. “श्वासावाटे घेतली जाणारी दम्याची औषधं सर्वांना सहज उपलब्ध करून देणं” ही यावर्षीची संकल्पना आहे.

<><><><><>

जातनिहाय जनगणनेविषयी सर्व राजकीय पक्षांबरोबर संवाद साधावा, अशी मागणी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे. प्रधानमंत्र्यांना त्यांनी तसं पत्र लिहीलं असून त्यात तेलंगण सरकारनं राबवलेल्या जातनिहाय जनगणनेचं प्रारूप केंद्रसरकारनं  पाहावं अशी सूचना केली आहे. आरक्षणावरची ५० टक्क्यांची मर्यादा हटवावी, खासगी शिक्षण संस्थांमधे अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गियांसाठी आरक्षण ठेवावं असे अनेक मुद्दे खरगे यांनी सुचवले आहेत. दरम्यान खरगे यांच्या पत्रावर भाजपानं टीका केली आहे. जातनिहाय जनगणनेचा निर्णय सरकारने काँग्रेसकडून घेतल्यामुळे त्याचं श्रेय मिळवण्यासाठीची ही धडपड असल्याचा आरोप भाजपा प्रवक्ते गुरुप्रकाश यांनी केला आहे.

<><><><><>

न्यायव्यवस्थेत पारदर्शकता कायम राखण्याच्या उद्देशाने सर्वोच्च न्यायालयाने सरन्यायाधीशांसह सर्व न्यायाधीशांच्या मालमत्तेचा तपशील जाहीर केला आहे. यासह सर्वोच्च न्यायालय आणि देशभरातल्या उच्च न्यायालयातल्या न्यायाधीशांच्या नियुक्तीची संपूर्ण प्रक्रियाही जाहीर करण्यात आली आहे. गेल्या

महिन्यात १ तारखेला सर्वोच्च न्यायालयाने सर्व न्यायाधीशांची मालमत्ता जाहीर करण्याचा निर्णय घेतला होता.

**<><><><>**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांना आज अभिवादन करण्यात येत आहे. सामाजिक समता प्रस्थापित करणारे, बहुजनांचे तारणहार असलेले शाहू महाराज यांच्या महान विचार आणि कार्याला शतश: प्रणाम, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शाहू महाराजांना अभिवादन करताना म्हटलं आहे सामाजिक परिवर्तनाला गती देत समाज विकासात शाहू महाराजाचं योगदान अमूल्य असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शाहू महाराजांना अभिवादन करतांना म्हंटलं आहे.

**<><><><>**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं काल जाहीर केलेल्या नव्या क्रमवारीमध्ये भारतीय क्रिकेट संघानं एकदिवसीय आणि टी-२० क्रिकेटमध्ये अव्वल स्थान राखलं आहे. मात्र, कसोटी क्रिकेटमध्ये भारत चौथ्या स्थानी घसरला आहे. ऑस्ट्रेलियानं कसोटी क्रिकेटमध्ये आपलं अव्वल स्थान कायम ठेवलं आहे. या क्रमवारीत बेन स्टोक्सच्या नेतृत्वाखाली इंग्लंडनं दुसऱ्या स्थानावर झेप घेतली आहे.

**<><><><>**

बिहारमध्ये सुरू असलेल्या सातव्या खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत जलतरणात आदिती हेगडे हिने सुवर्णपदक पटकावत महाराष्ट्रासाठी पदकांचं खातं उघडलं. जलतरण क्रीडा प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी एक सुवर्ण एक रौप्य आणि पाच कास्य अशी सात पदकं मिळवली. तिरंदाजीत महाराष्ट्राचे सात खेळाडू पदकासाठी लढणार आहेत. मल्लखांबमध्येही सांघिक प्रकारात मुलांनी आघाडी घेतली आहे. खो-खोमध्ये पंजाबचा ५८ विरुद्ध ९ असा पराभव करत महाराष्ट्राच्या मुलींनी विजयी सलामी दिली. या स्पर्धेत कर्नाटक चार सुवर्ण आणि पाच रौप्य पदकांसह

पदकतालिकेत पहिल्या, दिल्ली दोन सुवर्णपदकांसह दुसऱ्या आणि राजस्थान तिसऱ्या स्थानावर आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट मधे आज संध्याकाळी मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना होणार आहे. हा सामना संध्याकाळी साडे सात वाजता सुरू होईल. काल रात्री दिल्ली कॅपिटल्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यातला सामना हैदराबादमध्ये मुसळधार पावसामुळे रद्द करण्यात आला.

**<><><><><>**

गुजरात, आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, सौराष्ट्र, कच्छ, तामिळनाडू, पुद्दुचेरी, उत्तराखंड आणि पश्चिम राजस्थानमध्ये आज मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. पुढील २ ते ३ दिवसांत दिल्ली, महाराष्ट्र, ओडिशा, पंजाब, तामिळनाडू, पुद्दुचेरी, तेलंगणा, विदर्भ, पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्ये वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. तर पूर्व मध्य प्रदेश, मध्य महाराष्ट्र आणि उत्तराखंडमध्ये गारपीट होण्याची शक्यता आहे. येत्या २ दिवसांत राजस्थानमध्ये धुळीचं वादळ येण्याची शक्यता विभागानं वर्तवली आहे. हवामान विभागानं येत्या चार दिवसांत राज्याच्या अनेक भागात अवकाळी पाऊस आणि गारपीटीचा अंदाज वर्तवला आहे. मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगडसह आसपासच्या जिल्ह्यांत हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे तसचं ३० ते ४० किमी प्रती तास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. काल परभणी, जळगाव, जालना यांसह विदर्भ आणि मराठवाड्याच्या अनेक भागांत तीव्र वाऱ्यासह पाऊस झाला आणि गारा पडल्या. त्यामुळे पिकांचं नुकसान झालं आहे.

**//<><><><><>//**